२५

**महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम- ७९ मध्ये एड्स या रोगाचा समावेश करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

शासन निर्णय क्रमांक : अरजा-२४०४/प्र.क्र.२५/०५/सेवा-८
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक: २० जानेवारी, २००५

**शासन निर्णय**

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम- ७९ अनुसार क्षयरोग/ कर्करोग/ कुष्ठरोग/ पक्षघात झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना परिशिष्ट- तीन मधील नियमांनुसार रजा मंजूर करण्यात येते. एड्स झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांनाही नियम- ७९ अन्वये रजा देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन आता असा आदेश देत आहे की, एड्स या रोगाचा समावेश महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम- ७९ मध्ये करण्यात यावा.

३. जे शासकीय कर्मचारी जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या एड्स रुग्णांच्या व्याख्येनुसार "एड्सग्रस्त" आहेत व त्यासाठी त्यांच्यावर उपचार सुरु आहेत अशा कर्मचाऱ्यांनाच विशेष रजा मंजूर करण्यात यावी. तथापि, एच.आय.व्ही. पॉझिटीव्ह हे एड्सग्रस्त रुग्ण नसल्याने त्यांना विशेष रजा देय होणार नाही.

(**एड्सरुग्णांची व्याख्या** - १२ वर्षावरील व्यक्तीसाठी - दोन होकारात्मक चाचण्या [एलायझा/ जलद/ साधी चाचणी यापैकी कोणत्याही] आणि पुढीलपैकी कोणतेही एक लक्षण: (अ) वजनात घट (१० टक्केपेक्षा जास्त), जुलाब होणे (वारंवार किंवा सतत) आणि एक महिन्यापेक्षा जास्त काळापर्यंत येणारा ताप (ब) क्षयाची बाधा (क) चेतासंस्थेचे विकार (ड) बुरशी जन्य आजार (इ) न्युमोनिया / श्वसनदाह (ई) तत्वेचा कॅन्सर (कापोसी सारकोमा) (उ) इतर - मेंदूज्वर / वारंवार होणारी नागीण.)

४. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

५. महाराष्ट्र नागरी (रजा) नियम १९८१ मधील नियम ७९ मध्ये रितसर सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

६. हे आदेश शासनाच्या खालील संकेत स्थळांवर (Web sites) उपलब्ध होऊ शकतील: -

(i) finance.mah.nic.in.

(ii) www.maharashtra.gov.in.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नसीमा शेख**
**शासनाच्या उप सचिव**

प्रति,
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),